# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

'सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ'

## महाविद्यालय विकास विभाग

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपूर–४४० ००१, दुरध्वनी क्रमांक: ०७१२–२५२९९३२,२५२२३९०

फॅक्स नं. ०७१२–२५५५७०१, Email ID : infoarcollege@ymail.com


क्र.म.वि.वि./१५६ दिनांक:– १७ /०७ /२०२०.

प्रति,

प्राचार्य,
सर्व संलग्नीत अव्यवसायिक महाविद्यालय,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

विषय:– पदवी (यु.जी.) अभ्यासक्रमातील सत्र २०२०–२१ मधील प्रथम वर्षातील प्रवेशाकरिता निश्चित करण्यात आलेली प्रक्रिया व वेळापत्रकाबाबत.

महोदय/महोदया,

आपणांस कळविण्यांत येते की, विद्यापीठाद्वारे दरवर्षीप्रमाणे अव्यवसायिक महाविद्यालयातील पदवी (युजी) स्तरावरील अभ्यासक्रमात सत्र २०२०–२०२१ मध्ये होणा–या प्रथम वर्षातील प्रवेशाकरिता सर्व महाविद्यालयाकरिता समान वेळापत्रक निश्चित करण्यांत आले आहे. (सोबत प्रत संलग्नीत केली आहे.) त्याचप्रमाणे मा. कुलपती कार्यालयाचे निर्देशानुसार कोरोनाचे प्रार्दुभावामुळे यावर्षी करण्यांत येणारे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने करावयाचे आहे. त्यानुसार पदवी स्तरावरील अभ्यासक्रमात प्रवेश घेवू इच्छिणारे विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या https://rtmnu.university या वेब पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी दि. १७–७–२०२० ते २६–७–२०२० या कालावधीत करावयाची असून नोंदणी झाल्यानंतर विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेशाकरिता अर्ज सादर करावयाचे आहेत. महाविद्यालयात अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांनी जी कागदपत्रे नोंदणी करतांना अपलोड केली आहेत त्याची तपासणी करुन ती बरोबर असल्यावरच किंवा कमी असलेली कागदपत्रे महाविद्यालयातून अपलोड केल्यानंतरच दि. २८–७–२०२० पर्यंत नोंदणी पावतीसह अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची मेरिट लिस्ट महाविद्यालय स्तराबर तयार करुन दि. ३१–७–२०२० पर्यत महाविद्यालयात प्रसिध्द करावयाची आहे. त्यानंतर प्रविण्य सुचिमधून मेरिट व आरक्षण धोरणानुसार विद्यार्थ्यांना दि. ४–८–२०२० ते ८–८–२०२० पर्यंत प्रवेश देण्यात यावेत. त्यानंतर जागा रिक्त असल्यास दि. १०–८–२०२० ते १२–८–२०२० पर्यंत प्रविण्यसुचितील उर्वरित विद्यार्थ्यांना नियमानुसार प्रवेश देण्यात यावे. वरीलप्रमाणे देण्यात आलेले सर्व प्रवेश महाविद्यालयाला लगेच विद्यापीठाच्या https://rtmnu.university या वेब पोर्टलवर अपलोड करावयाचे आहे. जी महाविद्यालये देण्यात आलेले प्रवेश विद्यापीठाच्या वेब पोर्टलवर विहित मुदतीत अपलोड करणार नाहीत त्या महाविद्यालयाचे प्रवेश ग्राहय धरण्यात येणार नाही. व त्यांची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील याची कृपया नोंद घ्यावी.

त्याचप्रमाणे आपणांस सुचित करण्यांत येते की, उपरोक्त सर्व प्रक्रिया केल्यानंतर देखिल महाविद्यालयात जागा रिक्त राहील्यास विद्यापीठाद्वारे प्रवेशाकरिता नियमानुसार जी शेवटची तारीख निश्चित करण्यांत येईल त्या तारखेपर्यंत कौसिलिंग व स्पॉट ॲडमिशन द्वारे विद्यार्थ्यांना प्रवेश देता येईल. परंतु त्या आधी अशा विद्यार्थ्यांची नोंदणी विद्यापीठाच्या पोर्टलवर करुन घ्यावी. सदर प्रवेश देखिल विद्यापीठाच्या वेब पोर्टलवर अपलोड करणे अनिवार्य राहील याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे.

टीप– विद्यापीठाच्या वेब पोर्टवल नोंदणी करण्याकरता विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाची मदत मागितल्यास महाविद्यालयांनी त्यांना नोंदणी करण्याकरिता योग्य ती व्यवस्था करावी.

आपला

(डॉ. रमण मदने)
उपकुलसचिव (अति.कार्य),

RASHTRASANT TUKADOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY
( Establishment by Government of Central Provinces Education Department by Notification No. 513 Dated the 1st of August, 1923
& presently a State University governed by Maharashtra Public Universities Act, 2016( Mah. Act No. VI of 2017 )
COLLEGE DEVELOPMENT SECTION
ChhatrapatiShivajiMaharaj Administrative Premises, Ravindranath Tagore Marg, Nagpur. Phone No.0712-2529932, 2522390
Fax No. 0712-2555701, Email ID : infoarcollege@ymail.com

No/RTMNU/CDD / 155

Dated 17/07/2020

# Common Admission Schedule for Under Graduate Non-Professional Courses Conducted by the Affiliated Colleges Academic Year 2020-2021

| | | |
|---|---|---|
| 1. | Registration on RTMNU Site | From 17-7-2020 to 26-7-2020 |
| 2. | Sale of Prospectus | From 17.7.2020 |
| 3. | Submission of Application Form to the college along with Registration Slip | From 17-7-2020 to 28-7-2020 |
| 4. | Display of Merit List & Waiting List. | Date 31-7-2020 after 2.00 pm. |
| 5. | Finalization of Admissions From Merit List | From 4-8-2020 to 8-8-2020 |
| 6. | Finalization of Admissions From Waiting List | From 10-8-2020 to 12-8-2020 |
| 7. | Counseling & Spot Admissions ( if necessary) | Till last date of admission prescribed by the University against Vacant Seats |

**Note –**

1. **Above Schedule is applicable to Autonomous Colleges as well.**

(Dr. Raman Madne)
Deputy Registrar
College Development Section
(Addl. Charge)